ePaper
अजित पवार मुख्यमंत्री झाले, तर सरकारचं वाटोळं होईल: आमदार बच्चू कडू



| वर्ष - 7 | अंक - 106 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | शुक्रवार, दिनांक 18 ऑगस्ट 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

**आतील पानांत**

- पुणे स्थानक अनुत्तीर्ण!!
- मेट्रोची 'बत्ती गुल' कोणामुळे ?
- चीन सीमा तोडण्याचे मृगजळ

# शिवसेना-वंचित युतीची केवळ घोषणा?

## » पक्ष बळकटीसाठी प्रयत्न हवेत : शहरात संधी पण पक्षश्रेष्ठींचे लक्ष नाही?

। पिंपरी। महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**राज्यभरात शिवसेनेमध्ये दोन गट पडल्याने शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष सध्या तरी खिळखिळा झाल्याचे चित्र निर्माण केले आहे. तर दुसरीकडे बहुजनांचा मोठा पाठिंबा असूनही एकही आमदार अथवा खासदार निवडून आणण्यात वंचित बहुजन आघाडी अपयशी ठरली आहे.**



दोन्ही पक्षांनी सध्या ऐकमेकांच्या हातात हात घालून युतीची घोषणा केली आहे. त्यामुळे किमान खचलेल्या कार्यकर्त्यांचे मनोबल वाढेल, अशी शक्यता आहे. मात्र पक्ष संघटना बळकट करायची असेल तर अधिक जोमाने कामाला लागण्याची गरज निर्माण झाली आहे. पिंपरी-चिंचवड शहरात दोन्ही पक्षाला मिळणारा पाठिंबा पाहता यशाचा मोठा पॅटर्न त्यामुळे निर्माण होण्याची शक्यता आहे.पिंपरी-चिंचवड शहरात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे यांना मानणारा मोठा वर्ग आहे. शिवसेनेत द्वंद निर्माण होण्यापुर्वी शहरात पक्षाचे 9 नगरसेवक, दोन्ही लोकसभेला खासदार, पिंपरी विधानसभेला एक आमदार निवडून आले आहेत. भोसरी मतदारसंघात शिवसेनेचा उमेदवार कायम दुसऱ्या क्रमांकावर राहिला आहे. राज्यात राजकीय सत्ता नाट्य घडल्यानंतर शिवसेनेत दुफळी निर्माण झाली. पिंपरी-चिंचवड शहरातही आजी माजी खासदारांनी आपला गट घेऊन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत जाणे पसंत केले. या परिस्थितीमुळे पिंपरी-चिंचवडमधील कट्टर शिवसैनिकाची अवस्था मनोबल खचल्याची असल्याचे दिसते. या कार्यकर्त्यांमध्ये उत्साह वाढवायचा असेल तर प्रभागनिहाय पदाधिकाऱ्यांच्या नेमणूका करून त्यांना ताकद देणे गरजेचे आहे. राज्यातील वरिष्ठ नेत्यांच्या भेटीगाठी वाढायला हव्यात.

### वंचितकडे केडर कार्यकर्ता हवा...

» वंचित बहुजन आघाडीने बहुजन समाजातील अधिक लोकांना आपल्या पक्षाकडे आकर्षित करायला यश मिळविले आहे. पक्षाचे सर्वेसर्वा ॲड. प्रकाश आंबेडकर यांच्या विचारांचा प्रभाव सर्व जाती धर्मातील नागरिकांवर पडताना दिसत आहे. त्याचा परिपाक म्हणून सध्या वंचित बहुजन आघाडीमध्ये अनेक जाती-धर्मांचे नेतृत्त्व शिरस्थानी असल्याचे दिसते. पक्षाच्या शिस्तबद्ध नियमात सध्या पदाधिकारी काम करत आहेत. मात्र केडर कार्यकर्ता निर्माण करण्याची गरज आहे. या कार्यकर्त्यांनी पक्षाला मिळालेल्या जनतेच्या समर्थनाचे रुपांतर मतांमध्ये केल्यास वंचितचे पदाधिकारी पिंपरी-चिंचवड महापालिका, विधानसभा आणि लोकसभेत आपला ठसा उमटवतील.

### एकत्रित कार्यक्रमाकडे दुर्लक्ष...

» शिवसेना आणि वंचित हे दोन्ही पक्ष आपापल्या हिताचा विचार करण्याएवढे प्रगल्भ आहेत. मात्र शहरात यश मिळवायचे असल्यास संयुक्तरित्या कार्यक्रम राबवणे गरजेचे आहे. तरच एकत्रित ताकद दिसेल. त्याचा निवडणुकीत फायदा होईल. त्याची अंमलबजावणी केल्यास या युतीचे भविष्य ठरणार आहे.

# 'स्कूल बस' नियमावलींचे उल्लंघन नकोच!

## » दीपक मोढवे-पाटील यांची मागणी : शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांना निवेदन

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवडसह राज्यातील शहरांमध्ये स्कूल बसमधून प्रवास करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या स्कूल बसबाबत शासनाने कठोर कारवाईची भूमिका घ्यावी, अशी मागणी भाजपाचे माजी शहर उपाध्यक्ष दीपक मोढवे-पाटील यांनी केली आहे**



याबाबत राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर आणि शालेय शिक्षण व क्रीडा विभागाला निवेदन पाठवले आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, पिंपरी-चिंचवड शहरातील स्कूल बसचालक सर्रासपणे नियमांना डावलून बस चालवत आहेत. अनेक बस चालकांनी बसचे योग्यता प्रमाणपत्र घेतलेले नाही. जून महिन्यात सर्व शाळा सुरु झाल्या आहेत. त्यामुळे सर्व शालेय विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या वाहन मालकांनी त्यांच्या वाहनांच्या योग्यता प्रमाणपत्राची तपासणी करुन घेणे गरजेचे आहे. 'आरटीओ'कडून तसे आवाहन करूनही त्याकडे दुर्लक्ष केले केल्याचे दिसत आहे. स्कूल बस नियमावलीमधील विद्यार्थी व वाहनाच्या सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक असणाऱ्या बाबींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

स्पीड गव्हर्नर, वैध योग्यता प्रमाणपत्र, वैध विमा प्रमाणपत्र, वाहनामध्ये परिचारक असणे, अग्निशमन यंत्रणा असणे इत्यादी बाबींचा त्यामध्ये समावेश आहे. स्कूल बस नियमावलीची पूर्तता करीत असल्याची व शालेय विद्यार्थी वाहतुकीचा परवाना असल्याची खातरजमा करून वाहन मालकांनी विद्यार्थ्यांची वाहतूक करणे आवश्यक आहे. या बरोबरच एका स्कूल बसमध्ये किती विद्यार्थी बसवावेत या बाबत देखील शासकीय नियमावली जाहीर करण्यात आली आहे. तरी देखील त्याकडे पिंपरी-चिंचवडसह राज्यातील सर्वच शहरांत दुर्लक्ष होताना दिसत आहे. नुकतेच एका स्कूल बसमध्ये तब्बल 92 विद्यार्थी बसवून चुकीच्या पद्धतीने प्रवास केल्याचे धक्कादायक वृत्त समोर आले आहे. विद्यार्थ्यांचा जीव धोक्यात घालून बस चालक-मालक प्रवास का करतात? असा प्रश्न आहे. एखादी दुर्घटना घडल्यास त्याला जबाबदार कोण, असाही प्रश्नही दीपक मोढवे-पाटील यांनी उपस्थित केला आहे.



"ज्या बस चालक-मालकांनी योग्यता प्रमाणपत्र घेतलेले नाही. त्यांना प्रवास करण्याची परवानगी देऊ नये. तसेच अवैधरित्या नियमबाह्यपणे अधिक विद्यार्थ्यांना एका बसमध्ये बसवून प्रवास केल्यास संबंधितांवर कठोर कायदेशीर कारवाई करावी. विद्यार्थ्यांच्या सुरक्षित प्रवासाबाबत पालकांमध्ये चिंता असून, याबाबत प्रशासनाने ठोस उपाययोजना करणे अपेक्षी आहे.

**–दीपक मोढवे-पाटील,** माजी शहर उपाध्यक्ष, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

# एसटी'चा आरसा ! पुणे स्थानक अनुत्तीर्ण!!

## स्वारगेट, शिवाजीनगर स्थानके काठावर पास

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**एसटी स्थानक म्हटले की सगळीकडे अस्वच्छता, स्वच्छतागृहांची दुरवस्था, दुर्गंधी, मोडलेल्या खुर्च्या आणि रया गेलेली इमारत असे चित्र सर्वसाधारणपणे दिसते. हे चित्र बदलण्यासाठी स्वच्छ व सुंदर एसटी बस स्थानकांचे अभियान राबविण्यात येत आहे. त्याअंतर्गत झालेल्या सर्वेक्षणात पुण्यातील प्रमुख स्थानकांपैकी स्वारगेट आणि शिवाजीनगर (वाकडेवाडी) काठावर उत्तीर्ण झाली असून, पुणे स्थानक अनुत्तीर्ण ठरले आहे.**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन (एसटी) महामंडळाचीही वाहतूक स्वच्छ आणि सुंदर वातावरणात व्हावी, अशी सूचना एसटी महामंडळाचे अध्यक्ष व मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली होती. त्यानुसार एसटी महामंडळाने राज्यातील ५७७ एसटी बसस्थानके स्वच्छ, सुंदर बनवण्यासाठी पाऊल उचलले. यासाठी बाळासाहेब ठाकरे स्वच्छ, सुंदर बसस्थानक अभियान सुरू केले.

यात राज्यातील सर्व बसस्थानकांचे मे आणि जून महिन्यातील कामगिरीचे मूल्यमापन जुलैमध्ये करण्यात आले. दर दोन महिन्यांनी हे मूल्यमापन करून अंतिम गुण निश्चित करून विजेती स्थानके ठरविली जाणार आहेत.

यात पुणे विभागातील ४२ स्थानकांचे सर्वेक्षण करून त्यांचे मूल्यमापन करण्यात आले. पुण्यातील प्रमुख स्थानकांपैकी स्वारगेटला ५१ गुण, शिवाजीनगरला ५२ गुण आणि पुणे स्थानकाला ४० गुण मिळाले. हे गुण १०० पैकी असून, ५० गुणांच्या पुढे स्थानके उत्तीर्ण असल्याचे गृहित धरले जाते. म्हणजेच स्वारगेट आणि शिवाजीनगर ही स्थानके काठावर उत्तीर्ण झाली असून, पुणे रेल्वे स्थानक अनुत्तीर्ण ठरले आहे. पुणे विभागात नारायणगाव स्थानक ७४ गुणांसह प्रथम स्थानी आहे.

सर्व बसस्थानकातील स्वच्छतेचे मूल्यमापन करण्यासाठी परीक्षण समित्या नियुक्त करण्यात आल्या आहेत. या समित्या दुसऱ्या विभागात जाऊन दर दोन महिन्यांनी मूल्यमापन करीत आहेत. त्यात बसस्थानक परिसर, स्वच्छतागृह, बसची स्वच्छता, सुशोभीकरण याआधारे गुण दिले जातील. तसेच, कर्मचाऱ्यांचे प्रवाशांसोबत सौजन्याने वागणे, उत्पन्न वाढीसाठी केलेली प्रयत्न, बसचे वेळापत्रक अशा प्रकारच्या प्रवासी अभियानासाठीही गुण दिले जातात.



### स्थानकांना गुण कशाच्या आधारे?

- बसस्थानक, परिसर व स्वच्छतागृहे : ५० गुण
- बस गाड्यांची स्वच्छता : २५ गुण
- कर्मचाऱ्यांची सौज्यनशीलता, प्रवासी अभियान : २५ गुण

### एकूण दोन कोटींची बक्षिसे

स्वच्छ, सुंदर बस स्थानकांना प्रदेश व विभागनिहाय बक्षिसे दिली जाणार आहेत. पहिला क्रमांक पटकावणाऱ्या बसस्थानकांना प्रदेश व विभागनिहाय ५० लाख, २५ लाख, तर १० लाख रुपयांचे बक्षीस देण्यात येईल. या अभियानांतर्गत बस स्थानकांना एकूण दोन कोटींची बक्षिसे दिली जाणार आहेत.

> काही बसस्थानकांमध्ये आम्हाला गुण कमी मिळाले आहेत. त्या ठिकाणी लोकसहभागातून दुरुस्ती आणि सुशोभीकरणाची कामे करण्याचे नियोजन आहे. दर दोन महिन्यांनी सर्वेक्षण होणार असून, स्थानकांचे चित्र बदलण्याचा प्रयत्न सुरू आहे.
>
> – **कैलास पाटील,** विभाग नियंत्रक, एसटी

# मेट्रोची 'बत्ती गुल' कोणामुळे ?

## वनाझ ते रुबी हॉल वीजपुरवठा खंडित

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे मेट्रोच्या वनाझ ते रुबी हॉल मार्गावरील सेवेला सोमवारी (ता. १४) ब्रेक लागला होता. वीजपुरवठा खंडित झाल्याने सेवा २० मिनिटे ठप्प झाली होती. याप्रकरणी महामेट्रोने महापारेषणकडे बोट दाखविले होते. आता महापारेषणने महामेट्रोच्या तांत्रिक चुकीमुळे वीजपुरवठा खंडित झाल्याचा दावा केला आहे. त्यामुळे मेट्रोची बत्ती नेमकी कोणामुळे गुल झाली, असा प्रश्न निर्माण झाला आहे.**



मेट्रोच्या वनाझ ते रुबी हॉल मार्गावरील वीजपुरवठा १४ ऑगस्टला सायंकाळी साडेपाचच्या सुमारास खंडित झाला होता. त्यामुळे या मार्गावरील सेवा बंद झाली. सर्व मेट्रो गाड्या स्थानकावर २० मिनिटे उभ्या होत्या. या मार्गावरील वीजपुरवठा सुरळीत करण्यास सुमारे २० मिनिटांचा कालावधी लागला. त्यानंतर या मार्गावरील सेवा पूर्ववत झाली होती.

याप्रकरणी महामेट्रोने महापारेषणकडे बोट दाखविले होते. मात्र यावर खुलासा करीत हा सर्व प्रकार मेट्रोचीच चूक असल्याचे महापारेषणने म्हटले आहे. महामेट्रोचे वीज उपकेंद्र रेंजहिल्स येथे आहे. तेथील ट्रान्सफॉर्मरची देखभाल व दुरुस्ती सुरू होती.

हे काम त्रयस्थ संस्थेला देण्यात आले आहे. या संस्थेच्या तंत्रज्ञाकडून चूक झाली आणि वीजपुरवठा खंडित झाला. त्यामुळे मेट्रो सेवा ठप्प झाली. नंतर त्यांनीच हा वीजपुरवठा सुरळीत केल्याने मेट्रोसेवा पूर्ववत सुरू झाली, असे महापारेषणने म्हटले आहे. या निमित्ताने दोन सरकारी यंत्रणांमधील विसंवाद समोर आला आहे. त्याचबरोबर नेमकी चूक कोणाची, असा प्रश्नही निर्माण झाला आहे.

# ४६ लाखांचे अमली पदार्थ जप्त ; तिघे अटकेत




।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

शहरात कोकेन, मेफेड्रोनची विक्री करणाऱ्या एका महिलेसह तिघांना गुन्हे शाखेच्या अमली पदार्थ विरोधी पथकाने पकडले. मुंढवा भागात ही कारवाई करण्यात आली. आरोपींकडून ४६ लाख ५९ हजार रुपयांचे कोकेन, मेफेड्रोन जप्त करण्यात आले.

सागर कैलास भोसले (वय २६, रा. खराडी), अजितसिंग इंद्रजितसिंग भवानीया (वय ४०, रा. लोहगाव रस्ता), इम्रीन गॅरी ग्रीन (वय ३७, रा. लोहगाव रस्ता) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत.

मुंढव्यातील लोणकर वस्ती भागात दोघेजण अमली पदार्थ विक्रीसाठी येणार असल्याची माहिती अमली पदार्थ विरोध पथकाला मिळाली. पोलिसांनी भोसले आणि ग्रीन यांना पकडले. त्यांच्याकडून ४६ लाख ५९ हजार रुपयांचे अमली पदार्थ जप्त करण्यात आले.

चौकशीत दोघांनी भवानीया याच्याकडून अमली पदार्थ खरेदी केल्याची माहिती मिळाली. गुन्हे शाखेचे अतिरिक्त पोलीस आयुक्त रामनाथ पोकळे, उपायुक्त अमोल झेंडे, सहायक आयुक्त सुनील तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक विनायक गायकवाड, सहायक निरीक्षक लक्ष्मण ढेंगळे, शैलजा जानकर, विशाल दळवी, मारुती पारधी, मनोज साळुंके आदींनी ही कारवाई केली.

# भोसरीत ‘राष्ट्रभक्तीचा जागर’!

## तिरंगा रॅली : सुमारे दीड हजार दुचाकीस्वारांचा सहभाग

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या निमित्त भोसरीमध्ये तिरंगा बाईक रॅली काढण्यात आली. आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकाराने काढलेल्या या रॅलीत सुमारे दीड हजार दुचाकीस्वारांनी सहभाग घेतला. तसेच, “भारत माता की जय” अशा जयघोषामुळे परिसर दणाणला. भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित्त"हर घर तिरंगा" या अभियानांतर्गत भारतीय जनता पार्टी, भोसरी विधानसभा यांच्या वतीने स्वराज्याचे जनक छत्रपती शिवाजी महाराज यांना वंदन करून "भव्य तिरंगा बाईक रॅली" चे आयोजन करण्यात आले. रॅलीस भोसरी येथे सुरुवात होऊन आळंदी रोड मार्गे दिघी येथील सैनिक भवन येथे समारोप करण्यात आला.**

तसेच "मेरी माती, मेरा देश" या अभियान अंतर्गत सैनिक भवन, दिघी येथे देशसेवेसाठी आपले जीवन समर्पित करणाऱ्या सेवानिवृत्त सैनिकांचा सत्कार व शहीद जवानांना आदरांजलवाहण्यात आली.

पिंपरी-चिंचवडचे माजी महापौर राहुल जाधव, माजी स्थायी समिती अध्यक्ष नितीन लांडगे, संतोष लोंढे, विलास मडगिरी, टेल्को युनियनचे अध्यक्ष सचिन लांडगे, माजी नगरसेवक विकास डोळस, सागर गवळी, राजेंद्र लांडगे, निर्मला गायकवाड, सोनाली गव्हाणे, दिनेश यादव, गोपी अप्पा धावडे, पांडाभाऊ साने, राजेश सस्ते, सुधीर काळजे, दत्ता गव्हाणे, उदय गायकवाड, कविता भोंगळे, निलेश लोंढे, संतोष गाढवे, हनुमंत लांडगे, किसन बावकर, विकास बुर्डे, अर्जुन ठाकरे, सम्राट फुगे आदी उपस्थित होते.





“ समर्पण आणि राष्ट्रभक्तीचे प्रतिक असलेला तिरंगा... चंद्र, सूर्य असेपर्यंत अभिमानाने फडकत राहिला पाहिजे. यासाठी प्रत्येक भारतीय नागरिकांने तिरंगा राष्ट्रध्वजाचा आदर आणि आपल्या राष्ट्रभूमीबाबत त्याग भावना ठेवली पाहिजे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून पिंपरी-चिंचवड शहरात “हर घर तिरंगा अभियान” प्रभावीपणे राबवण्यात आले. याला शहरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. त्याबद्दल सर्व शहरवासीयांचे मी मनापासून आभार मानतो.

**-- महेश लांडगे, आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा.**

---


# कचरा संकलन केंद्राचा डाव उधळून लावू !

## सोसायटी फेडरशेनचा इशारा : मोशीतील सोसायटीजवळ प्रशासनाचे कचरा संकलन केंद्र?

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मोशी येथील सिल्व्हर - 9 या सहकारी गृहरचना संस्थेच्या जी बिल्डिंग शेजारी पिंपरी चिंचवड महापालिकेची मोकळी जागा आहे. या ठिकाणी कचरा संकलन केंद्र किंवा कचरा विलगीकरण केंद्र करू नये, अशी मागणी चिखली, मोशी, पिंपरी-चिंचवड हौसिंग फेडरेशनच्या वतीने करण्यात आली. सदरच्या मोकळ्या आरक्षित जागेत उद्यान विकसित करण्याची मागणी फेडरेशनच्या वतीने आयुक्त शेखर सिंह यांना दिलेल्या निवेदनात केली आहे. कचरा संकलन केंद्र निर्माण करण्याचा प्रयत्न केल्यास हा डाव उधळून लावू, असा इशाराही निवेदनाद्वारे दिला आहे.**



फेडरेशनच्या पुढाकाराने तसेच मोशी येथील स्वराज सोसायटी, शुभयोग सोसायटी, सिल्व्हर -9 सोसायटी, प्रिस्टीन ग्रीन फेज 1,2,3 , स्वदेशा सोसायटी या सर्व सहकारी गृहरचना संस्थांच्या मार्फत आयुक्तांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सिल्व्हर -9 सहकारी गृहरचना संस्था जी बिल्डिंगच्या शेजारी पिंपरी चिंचवड महापालिकेचा मोकळा भूखंड आहे. या भूखंडावर कचरा संकलन केंद्र, कचरा विलगीकरण केंद्र करण्याच्या हालचाली महापालिका प्रशासनाच्या सुरू असल्याची माहिती समजते आहे. त्या बाबत 16 ऑगस्ट रोजी या परिसरातील सर्व सोसायट्यांच्या सदस्यांबरोबर सामूहिक बैठक घेण्यात आली होती.

या बैठकीत झालेल्या चर्चेनंतर पिंपरी चिंचवड महापालिकेचे आरोग्य कार्यकारी अधिकारी गणेश देशपांडे, पर्यावरण विभागाचे सहशहर अभियंता संजय कुलकर्णी यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधण्यात आला. या वेळी या जागेवर कोणत्याही प्रकारचा कचरा डेपो, कचरा संकलन केंद्र, कचरा विलगीकरण केंद्र होणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे

अधिकाऱ्यांकडून ही स्पष्टता दिली आहे. मात्र भविष्यात देखील या ठिकाणी राहणाऱ्या सोसायटी धारकांचा विचार करून कोणतेही कचरा संकलन केंद्र, किंवा कचरा विलगीकरण केंद्र उभारू नये. तसा प्रयत्न झाल्यास या सर्व गोष्टीला फेडरेशनच्या वतीने तीव्र विरोध करण्यात येईल, असा इशारा निवेदनात देण्यात आला.

### ...तर साथीचे आजार पसरतील!


सिल्व्हर - 9 या सहकारी गृहरचना संस्थेच्या शेजारी असणाऱ्या मोकळ्या भूखंडावर कचरा संकलन केंद्र होऊ नये, अशी भूमिका नागरिकांनी घेतली आहे. तसा निर्णय झाल्यास त्याचा आजूबाजूच्या परिसरातील नागरिकांना दुर्गंधीचा त्रास सहन करावा लागणार आहे. तसेच आरोग्याच्या समस्या निर्माण होतील. पावसाळ्यात साथीचे आजार मोठ्या प्रमाणात पसरतील. या भीतीमुळे या ठिकाणी कचरा संकलन केंद्र नको, अशी भूमिका नागरिकांनी घेतली आहे. त्याबाबत नुकत्याच झालेल्या बैठकींमध्ये सर्व नागरिकांनी एकमताने याला विरोध केला आहे.

# चीन सीमा तोडण्याचे मृगजळ




**भारत आणि चीन यांच्यात ताजा सीमावाद सोडवण्याच्या दृष्टीने झालेली १९व्या फेरीची चर्चा सोमवारी निष्फळ ठरली. या फेरीचे वैशिष्ट्य म्हणजे, दोन दिवस ती चालूनही काही निष्पन्न झाले नाही. देप्सांग आणि देम्चोक या टापूंतील निर्लष्करी भूभाग आणि गस्तीक्षेत्राबाबत अजूनही तोडगा निघू शकत नाही, हाच या फेरीचा मथितार्थ.**

हा तोडगा निघत नाही तोवर प्रत्यक्ष ताबारेषेवर चीनने तीन वर्षांपूर्वी केलेल्या घुसखोरीचा पेच निवळला असे म्हणता येणार नाही. त्यात आता एका वृत्तानुसार, चीनच्या रेट्यामुळे आक्रसलेल्या क्षेत्रावर गस्तीची परवानगी द्यावी, ही भारताची विनंती चीनने मान्य केलेली नाही. 'आहे ती स्थिती स्वीकारावी मगच पुढे बोलू,' हा हेका धरून चिनी लष्करी अधिकारी वाटाघाटींसाठी येतात. त्यांनी गतवर्षी थोडी लवचीकता दाखवली होती. त्यामुळे बहुतेक टापूंबाबत काही प्रमाणात वाटाघाटींना यश आले होते. परंतु देप्सांग आणि देम्चोकबाबत वाटाघाटी बराच काळ खोळंबलेल्या आहेत. परवाच्या वाटाघाटींबाबत भारतीय परराष्ट्र खात्याने जारी केलेल्या निवेदनात 'दोन्ही बाजूंदरम्यान सकारात्मक आणि सखोल चर्चा झाली. विवाद्य मुद्द्यांवर त्वरेने तोडगा काढण्याबाबत मतैक्य झाले' अशी मौलिक माहिती कळाली! याचा अर्थ चर्चेच्या



आणखी काही फेऱ्या होतील ही शक्यता नाकारता येत नाही. काही माध्यमांच्या मते, येत्या काही दिवसांत पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि चीनचे अध्यक्ष क्षी जिनपिंग अनुक्रमे ब्रिक्स आणि जी-२० शिखर परिषदांच्या निमित्ताने दोन वेळा भेटणार असल्याने, राजकीय पातळीवर तोडगा शोधण्याच्या दृष्टीने चाचपणी होईल. परंतु ही अपेक्षा तथ्याधारित नाही. एक तर रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतिन सोडल्यास जिनपिंग हे इतर कुणालाही आपले मित्र मानत नाहीत. शिवाय गलवान चकमकीनंतर मोदी-जिनपिंग परस्परांना फारसे भेटलेलेच नाहीत. जेव्हा भेटले, तेव्हा त्यातून सीमा प्रश्न सोडवण्याच्या दिशेने फार प्रगती झाली असेही भासले नाही. चीनसारख्या विस्तारवादी देशाशी भूमालकीचे वाद नदीकाठी झोपाळ्यावर बसून किंवा शहाळ्यातले नारळपाणी आस्वादून सोडवण्यासारखे नाहीत हे मोदीही जाणतात. मुद्दा इतकाच आहे, की परिस्थिती जितके दिवस 'विद्यमान जैसे थे' राहील, तितकी आधीची स्थिती पुनर्स्थापित करणे अवघड होऊन बसेल. तसे होणे भारताच्या हिताचे अजिबात नाही. गलवानच्या किती तरी आधीपासून चीनने अनेक गस्तीक्षेत्रे काबीज करून आणि निर्लष्करी भागांमध्ये सैनिक पाठवून तेथील सीमांचे आरेखन बदलण्याचा पद्धतशीर प्रयत्न चालवला होता. आपण गाफील राहिलो आणि त्याचा फायदा चीनने उठवला. गलवान खोऱ्यात झालेल्या तुंबळ लढाईत भारतीय सैनिक प्राणपणाने लढले. संख्यात्मक आणि आयुधात्मक आघाडीवर चिनी लष्कर वरचढ असले, तरी गुणात्मक आघाडीवर भारतीय लष्कर तोडीस तोड ठरते हे पुन्हा एकदा दिसून आले होते. पण तशी धमक त्यानंतरच्या काळात आपले मुत्सद्दी आणि राजकीय नेतृत्व दाखवू शकले नाही आणि त्यातून हा प्रश्न चिघळला. सैन्यमाघारी आणि चकमकपूर्व स्थिती बहाल करण्यासंदर्भात गलवान खोरे, पँगाँग सरोवर, गोग्रा आणि हॉट स्प्रिंग्ज या भागांविषयीच्या वाटाघाटी सफल झाल्या. या ठिकाणांहून सप्टेंबर २०२२ पर्यंत दोन्ही बाजूंची सैन्यमाघारी झाली. दौलत बेग ओल्डी टापूतील देप्सांग आणि चार्डिंग नाला जंक्शन या देम्चोकमधील भूभागातून सैन्यमाघारीच्या वाटाघाटी मात्र पुढे सरकत नाहीत. देप्सांग भागात तर निर्धारित सीमेच्या १८ किलोमीटर आत भारतीय सैनिकांना गस्त घालण्यास मनाई केली जाते, असे वृत्त आहे. या भागातील दोन्हीकडील सीमावर्ती भागांमध्ये भारत आणि चीनने प्रत्येकी जवळपास ५० हजारांचे सुसज्ज सैन्य तैनात केले आहे. पूर्वस्थिती बहाल करायची झाल्यास, दोन्हीकडील सैन्य मागे हटवणे क्रमप्राप्त ठरते. पण हे जोवर चीनकडून होत नाही, तोवर अशी कृती आपल्यासाठी आत्मघात ठरेल अशी रास्त शंका भारतीय राजकीय आणि लष्करी नेतृत्वाला वाटते. वास्तविक वाटाघाटींच्या फेऱ्यांवर फेऱ्या होत राहतात, याचे कारण सीमावर्ती लष्करी कमांडर किंवा राजधानीतील त्यांचे जनरल यांना धोरणात्मक निर्णय घेण्याचे अधिकार नाहीत. ते केवळ राजकीय नेतृत्वाकडे आहेत. लष्करी सल्लागारांकडून फार तर टापूकेंद्री भौगोलिक बारकावे सादर केले जाऊ शकतात.

## संपादकीय »

### काका.. त्यांना वाचवा!

***गेले काही दिवस आधी महाराष्ट्रात आणि नंतर देशातील राजकारणात चघळला जात असलेला विषय म्हणजे शरद पवार आणि अजित पवार यांची पुण्यात झालेली भेट.***

गेले काही दिवस आधी महाराष्ट्रात आणि नंतर देशातील राजकारणात चघळला जात असलेला विषय म्हणजे शरद पवार आणि अजित पवार यांची पुण्यात झालेली भेट. याआधीही भाजपच्या आडोशाला गेल्यानंतर अजितदादा आणि मंडळींनी दोन वेळा काकांची भेट घेतली. त्या भेटी भर दिवसा अन्य कोणा ना कोणाच्या साक्षीने मुंबईतील यशवंतराव चव्हाण केंद्रात झडल्या. त्या वेळी 'आम्ही काकांचे आशीर्वाद घेण्यास त्यांना भेटलो', असे स्पष्टीकरण पुतण्याच्या वतीने दिले गेले. वास्तविक पुतण्याने घराच्या चार भिंतींच्या आड आशीर्वादासाठी काकांस नमन केले असते आणि काका आणि सौ. प्रतिभाताई काकू यांनी पुतण्याच्या हातावर दही-साखर ठेवून शुभास्ते पंथान: वगैरे म्हणत त्यांस शुभेच्छा दिल्या असत्या तर 'लोकसत्ता'लाच काय पण अन्य कोणालाही कसलीही उठाठेव करण्याची गरज वाटली नसती. पण तसे झाले नाही.

**अफगाणिस्तानमध्ये तालिबानची सत्ता पुन्हा प्रस्थापित होण्याच्या घटनेला १५ ऑगस्ट रोजी दोन वर्षे पूर्ण झाली. तालिबान राजवटीची दुसरी आवृत्ती पहिलीपेक्षा अधिक स्थिर आणि सहिष्णू असेल असे वाटले होते. या समजुतीला गेल्या दोन वर्षांतील घटनांनी सुरुंग लावला आहे. तालिबान्यांच्या आचरणात सुधारणेची कोणतीही चिन्हे दिसत नाहीत.**

# तालिबानशी चर्चेची अपरिहार्यता ?

त्यामुळे मध्यंतरीच्या काळात अफगाणिस्तानात दिसून आलेल्या स्त्री स्वातंत्र्य, धर्मस्वातंत्र्य आणि उद्यमस्वातंत्र्याचा पुन्हा संकोच झालेला आहे. विशेषत: युवती आणि महिलांच्या संचार, आचार व विचारांवर लादलेली बंधने झुगारली जाण्याची कोणतीही शक्यता नाही. कारण आता अमेरिकेसारख्या जगातील प्रमुख सत्तेने 'अफगाण भानगडी'तून अंग काढून घेतले आहे. अनेकदा प्रयत्न करूनही ब्रिटन, तत्कालीन सोव्हिएत महासंघ, अमेरिका या महासत्तांना अफगाणिस्तानात बस्तान बसवता आले नाही किंवा टोळी मानसिकतेतून या देशाला बाहेरही काढता आलेले नाही. तशात गतशतकाच्या अखेरीस वांशिक टोळीवाल्यांना अमेरिका आणि पाकिस्तानच्या कृपेने जिहादींची जोड मिळाली आणि अफगाणिस्तान हा जागतिक दहशतवादाचा, तसेच असहिष्णू धर्मवादाचा केंद्रबिंदू बनला. पाकिस्तानने पोसलेल्या तालिबानने



अफगाणिस्तानात १९९६मध्ये सत्ता स्थापली, तेव्हा या संघटनेविषयी भारताने नेहमीच संशयी आणि सावध भूमिका घेतली. १९९९मध्ये इंडियन एअरलाइन्सचे विमान अपहरण करून कंदाहारला नेण्यात आले, त्यावेळी भारताचा संशय दृढ झाला. १९९६ ते २००१ या काळात तालिबानची अफगाणिस्तानवर सत्ता होती, त्यावेळी भारताचे त्या देशाशी मर्यादित संबंध होते. २०२१ मध्ये २० वर्षांनी तालिबानची सत्ता त्या देशात फेरप्रस्थापित झाली, त्यानंतर भारताचे अफगाणिस्तान धोरण बरेच अस्पष्ट आणि गोंधळलेले दिसून येते. याचे एक प्रमुख कारण म्हणजे सोव्हिएत महासंघासारख्याच अमेरिकी फौजाही अफगाणिस्तानला वाऱ्यावर सोडून निघून जातील, असे आपल्याला सुरुवातीला तरी वाटले नव्हते. दहशतवादविरोधी लढ्याच्या निमित्ताने अमेरिकेने अफगाणिस्तानमध्ये शिरकाव करून तालिबान राजवटीला पराभूत केले. मात्र यानंतर क्षेत्रीय सरकारांना घेऊन अफगाणिस्तानमध्ये दीर्घकालीन, लोकनिर्वाचित, स्थिर सरकार निर्मिण्याच्या दृष्टीने कोणतेही प्रयत्न तत्कालीन अध्यक्ष धाकटे जॉर्ज बुश यांच्या प्रशासनाने केले नाहीत. त्यामुळे म्हणायला अफगाणिस्तानात लोकनिर्वाचित सरकारे सत्तेवर आली, तरी त्यांना म्हणावा तसा जनाधार नव्हता. हमीद करझाई आणि अश्रफ घानी या दोन्ही अध्यक्षांचे भारत आणि अमेरिकेशी उत्तम संबंध होते. परंतु अफगाणिस्तानातील तालिबान किंवा अल कायदा व नंतर रुजलेल्या आयसिससारख्या संघटनांची पाळेमुळे उखडून काढण्याचा कोणताही प्रयत्न वा द्रष्टेपणा या दोन नेत्यांच्या ठायी दिसून आला नाही.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# राज्यात दंगली घडवून निवडणुकीसाठी वातावरण तयार करण्याचे प्रयत्न !

## सरकारला बहुमत असूनही आत्मविश्वास नाही : अशोक चव्हाण

। सांगली । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्यात दंगली घडवून निवडणुकीचे वातावरण तयार करण्याचे काम सुरु आहे. सत्तेसाठी फोडा आणि झोडा कार्यक्रम राबवला जात आहे. आत्मविश्वास नसलेले स्थगिती सरकार सत्तेवर असल्याची टीका माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी केली. सांगली बाजार समितीत एका कार्यक्रमात ते बोलत होते.**



### पोंक्षे, भिडेंची लायकी नाही

» चव्हाण म्हणाले, संभाजी भिडे, शरद पोंक्षे यांना महत्व नाही. त्यांची दखल घ्यावी इतकी त्यांची लायकीही नाही. व्यक्तिगत पातळीवरील खालील दर्जाची विधाने सहन करणार नाही. अशी विधाने होत असतील तर सरकारने त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करायला हवी.

यावेळी आमदार डॉ. विश्वजीत कदम, सतेज पाटील, विक्रम सावंत, काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष पृथ्वीराज पाटील, जिल्हा बँकेच्या उपाध्यक्ष जयश्रीताई पाटील, जितेश कदम, वसंतदादा साखर कारखान्याचे अध्यक्ष विशाल पाटील, रावसाहेब पाटील आदी उपस्थित होते. चव्हाण म्हणाले, २०० आमदार असताना भाजपला फोडाफोडीची गरज काय? असा प्रश्न आहे.

सरकारला बहुमत असूनही आत्मविश्वास नाही. आगामी निवडणुकीत अन्य पक्षांच्या सोबतीशिवाय जिंकता येणार नाही अशीच भाजपची भावना झाली आहे. राज्यात इतके मंत्री असतानाही स्वातंत्र्यदिनी झेंडावंदनाला मंत्री मिळाले नाहीत. अनेक ठिकाणी जिल्हाधिकाऱ्यांनीच ध्वजवंदन केले. भाजपकडे गेलेल्यांना `आपण का इकडे आलो`? असे वाटत आहे. चव्हाण म्हणाले, पावसाने शेज्च्या नुकसानीची भरपाई मिळत नाही. फक्त घोषणा होत आहेत. शिक्षकांच्या ७२ हजार जागा रिक्त आहेत. दोन लाख शासकीय कर्मचाऱ्यांची पदे रिक्त आहेत, पण भरतीचे नियोजन नाही. परिस्थिती गंभीर आहे.

### मराठा आरक्षणासाठी कायदाच हवा

» चव्हाण म्हणाले, मराठा आरक्षणासाठी दिल्लीत कायदामंत्र्यासोबत बैठका व्हायला हव्यात. ५० टक्के मर्यादा असेपर्यंत आरक्षण मिळणार नाही, हे अजित पवारांनाही माहिती आहे. पण दिशाभूल सुरु आहे. कायदा केल्याशिवाय आरक्षण मिळणार नाही.

### आंबेडकरांनी महाविकास आघाडीत यावे

» वंचित बहुजन आघाडीच्या प्रकाश आंबेडकर यांची मानसिकता महाविकास आघाडीत येण्याची आहे. ते यावेत अशी माझीही व्यक्तिगत इच्छा आहे. त्यासंदर्भात त्यांच्याशी बोलणेही झाले आहे. निर्णय त्यांनीच घ्यायचा आहे. बीआरएस पक्षाचे नेते भाजपविरोधात बोलत नाहीत. भाजपला मदत करत आहेत. त्यांनी स्पष्ट भूमिका घ्यावी. पैसा खर्च करताहेत, पण परिणाम होणार नाही. संजय शिरसाटांना फार गांभीर्याने घेण्याची गरज नाही. ते दररोज काहीही बोलत असतात.

---

# सांगलीत बाळूमामा मंदिरातील हिशोब मागितला म्हणून दोन गटांत मारामारी

## संजयनगर पोलिस ठाण्यात परस्परविरोधी फिर्याद

। सांगली ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**शहरातील शिवोदयनगर येथे असलेल्या बाळूमामा मंदिर देवस्थानमधील पैशाचा हिशेब मागितल्यावरून अकरा जणांनी तरुणांसह अन्य दोघांना बेदम मारहाण केली. रविवार, दि. १३ रोजी मंदिराजवळ हा प्रकार घडला. याप्रकरणी दोन्ही गटांनी परस्परविरोधी फिर्याद संजयनगर पोलिस ठाण्यात दाखल केली आहे.**



विशाल पोपट यमगर (रा. लक्ष्मीनगर, जुना बुधगाव रोड, सांगली) याने दिलेल्या फिर्यादीनुसार आर्यन जाधव, अजय गोसावी, प्रशांत गोसावी, अभिषेक गोसावी, पार्थ जाधव, विक्रांत गोसावी, दीपक पाटील, सौरभ गोसावी, महेश्वर भोपी, दिनकर गोसावी, भगवान गोसावी (सर्व रा. लक्ष्मीनगर, जुना बुधगाव रोड, सांगली) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी यमगर हा जुन्या बुधगाव रोडवरील शिवोदयनगर येथील बाळूमामा मंदिरात गेला होता. त्यावेळी संशयित तेथे होते.

यावेळी विशालने देवस्थानमधील पैशाचा हिशेब संशयितांकडे मागितला. याचा राग आल्याने अकरा जणांनी विशालसह परमेश्वर दगडू थोरात आणि अक्षय अशोक यमगर यांना बेदम मारहाण केली.

### गुन्हे दाखल

» तर अश्विनी अनंत जाधव यांनी दिलेल्या फियादीनुसार संशयित विशाल यमगर आणि अन्य दोन सहकाऱ्यांनी फिर्यादीसह त्यांच्या आई आणि मुलास लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याचे नमूद केले आहे. यामध्ये अश्विनी जाधव, द्रौपदी भगवान गोसावी, पार्थ अनंत जाधव हे जखमी झाले आहेत. जखमींवर रुग्णालयात वैद्यकीय उपचार करण्यात आले आहेत. दोन्ही गटांच्या फिर्यादीनुसार संशयितांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

---

# चिनी खलाशाला हृदयविकाराचा झटका, अरबी समुद्रात रात्री थरार

। मुंबई । महाईन्यूज

काळोखी रात्र... खवळलेला समुद्र... घोंगावणारे वारे... अशा धोकादायक स्थितीतही तटरक्षक दलाच्या वैमानिकांनी हेलिकॉप्टर हवेत उडवले आणि हृदयविकाराचा झटका आलेल्या चिनी खलाशाचा खोल समुद्रात बचाव केला. बुधवार-गुरुवारच्या रात्री अरबी समुद्रात हा थरार घडला.

चीनची 'एमव्ही डोंग फँग कान तान' ही संशोधन नौका चीनच्या मकन बंदरावरून 'यूएई'कडे जात होती. अरबी समुद्रात मुंबईपासून २०० किमी अंतरावर असताना बुधवार, १६ ऑगस्टला दुपारी नौकेवरील एका खलाशाला हृदयविकाराचा झटका आला. नौकेने तत्काळ तटरक्षक दलाच्या वरळी येथील समुद्री बचाव समन्वय केंद्राकडे (एमआरसीसी) मदत मागितली. त्या वेळी तटरक्षक दलाची 'आयसीजीएस सम्राट' ही नौका त्याच परिसरात होती. या नौकेवर वैद्यकीय चमूदेखील होता. त्यानुसार 'आयसीजीएस सम्राट'ला तिकडे धाडण्यात आले. नौकेतील चमूने प्राथमिक उपचार केले. मात्र, त्यानंतरही त्या खलाशाची प्रकृती खालावत होती. त्यामुळे तत्काळ हेलिकॉप्टर बोलविण्याचा निर्णय घेण्यात आला. त्या वेळी रात्रीचे पावणे आठ वाजले होते. त्यानंतर खरा थरार सुरू झाला...

अत्यवस्थ खलाशापासून तटरक्षक दलाचा जवळचा हवाईतळ दमण येथे होता. मात्र, दमण तळावरील मदतीसाठीचे 'एएलएच ध्रुव' हे हेलिकॉप्टरही त्या वेळी हवाईतळापासून ३५० किमी दूर होते. त्या वैमानिकांना तातडीने संदेश पोहोचविण्यात आला. त्या वेळी हेलिकॉप्टरमध्ये इंधन कमी असल्याने हे वैमानिक दीड तासांचे उड्डाण करून आधी दमणला आले.

# मणिपूरवर पंतप्रधान गप्प का ?

## » देशाचे पंतप्रधान हे वडिलांसारखे : केजरीवाल

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**अरविंद केजरीवाल म्हणाले की, मणिपूरमध्ये महिलांची विवस्त्र धिंड काढण्यात आली. लोकांनी त्यांच्यावर अन्याय केला. सर्वांनी त्याचा निषेध केला, पण पंतप्रधान मोदी गप्प राहिले. देशाचे पंतप्रधान हे वडिलांसारखे असतात, पण मुलींची इज्जत लुटली जात असेल आणि बाप म्हणत असेल की त्याला काही देणेघेणे नाही, तर मुली कुठे जातील.**

मणिपूरमध्ये लोक मरत होते, घरे जाळली जात होती. महिलांसोबत चुकीचे होत होते. नुहमध्ये हिंसाचार होत होता, तेव्हा पंतप्रधान कडी लावून खोलीत बसले होते. पैलवानांनी न्याय मागितला, पंतप्रधान शांत राहिले. चीनच्या मुद्द्यावरही त्यांनी मौन बाळगले. अदानी प्रकरणात ते गप्प आहेत. गेल्या 9 वर्षांत जेव्हा जेव्हा देशात आपत्ती आली तेव्हा पंतप्रधान गप्प बसले आणि कडी-कुलूप लावून खोलीत बसले. पंतप्रधान गप्प का आहेत, असा प्रश्न संपूर्ण देश विचारत आहे. दिल्लीच्या मुख्यमंत्र्यांनी गुरुवारी विधानसभेत भाषण करताना या गोष्टी सांगितल्या. अरविंद केजरीवाल म्हणाले की, आज आपण सर्वजण येथे मणिपूरची चर्चा करत आहोत. मणिपूरमध्ये घडलेल्या घटना वेदनादायक आहेत. त्याहूनही क्लेशदायक बाब म्हणजे भाजपचे आमदार घराबाहेर पडले आणि आपला मणिपूरशी काहीही संबंध नाही, असे सांगून वाहिन्यांवर बाइट्स देत आहेत. मणिपूर हा त्यांच्यासाठी विषय नाही. हे मणिपूरच्या लोकांनाही दिसत आहे, त्यांना किती त्रास झाला असेल. हे फक्त भारतीय जनता पक्षाचे काही नेते सांगत नाहीत, तर वरपासून खालपर्यंत सर्व सरकारे आणि त्यांचे नेते पीएम मोदी यांचा संदेश आहे की त्यांचा मणिपूरशी काहीही



संबंध नाही. मणिपूरमध्ये 90 दिवसांत (3 मे ते 31 जुलै) 6500 एफआयआर नोंदवण्यात आले. 4 हजार लोकांची घरे जाळली, 60 हजार लोक बेघर झाले, पण पंतप्रधान गप्प राहिले. त्यांनी लोकांना शांततेचे आवाहनही केले नाही. दिल्लीचे मुख्यमंत्री म्हणाले की, ही काही पहिली वेळ नाही, गेल्या 9 वर्षांत जेव्हाही देशात आपत्ती आली तेव्हा पंतप्रधान खोलीत गप्प बसले. पंतप्रधान कुठेच दिसत नव्हते. अलीकडेच जंतरमंतरवर कुस्तीपटू धरणे धरत बसले होते. त्यांनी WFI अध्यक्षांवर गंभीर आरोप केले होते. पदक जिंकल्यानंतर ते आले तेव्हा पंतप्रधान म्हणाले की, तू माझी मुलगी आहेस, उद्या काही अडचण असेल तर माझ्याकडे या. आमच्यासोबत चुकीचं घडलं असं त्या महिला कुस्तीपटूंनी सांगितल्यावर पंतप्रधानांनी मौन बाळगलं. निदान ते म्हणाला असते की काळजी करू नको बेटा, मी इथे आहे. मी चौकशी करून दोषींवर कारवाई करेन. मणिपूरच्या मुद्द्यावर त्यांनी शांततेचे आवाहन केले असते, पण ते कडी लावून बसले. त्यांनी पैलवानांना दोन शब्द सांगितले असते की काळजी करू नको बेटा, ज्याने तुझ्यावर

### अ जाधीशांना 13 लाख कोटी कर्ज दिले

» अदानी प्रकरणात ते गप्प आहेत. गेल्या 9 वर्षात जेव्हा-जेव्हा देशात आपत्ती आली तेव्हा पंतप्रधान गप्प बसले आणि कडी लावून खोलीत बसले. गेल्या 9 वर्षांत काही अब्जाधीशांना बँकांकडून 13 लाख कोटी रुपयांची कर्जे देण्यात आली. नीरव मोदी पळून गेला, मेहुल चोक्सी पळून गेला, ललित मोदी पळून गेला, विजय मल्ल्या पळून गेला. पंतप्रधानांचे त्यांच्याशी काय नाते आहे हे देशाला जाणून घ्यायचे आहे.

अन्याय केला त्याला मी सोडणार नाही, पण त्यांनी काय केले. त्यांना सर्वोच्च न्यायालयात जावे लागले. केजरीवाल म्हणाले की, गेल्या 9 वर्षांपासून चीन आम्हाला डोळे दाखवत आहे, पंतप्रधान गप्प आहेत, त्यांचे तोंड बंद आहे. त्याच्या तोंडून चीन हा शब्दच निघत नाही. ऑक्टोबर 2019 मध्ये चीनचे राष्ट्राध्यक्ष भारतात आले होते. महाबळेश्वरमध्ये पीएम मोदी हातात हात घेऊन फिरत होते. 15 जून 2020 रोजी, चिनी सैन्याने आमच्यावर गलवान खोऱ्यात हल्ला केला आणि आमचे 20 सैनिक मारले. 2 हजार चौरस किलोमीटर क्षेत्रफळ व्यापले, पंतप्रधान शांत राहिले. अशा अफवा आहेत की काही लोक असा दावा करतात की एक करार झाला आहे आणि त्यांनी चीनला 2,000 चौरस किलोमीटर क्षेत्रफळ दिले आहे. जानेवारी महिन्यात परराष्ट्र मंत्री एस जयशंकर यांनी अत्यंत लाजिरवाणे विधान केले होते. ते म्हणाले की, चीन हा आपल्यापेक्षा मोठी अर्थव्यवस्था आहे, मी काय करू. छोटी अर्थव्यवस्था असताना मोठी अर्थव्यवस्था असलेल्या देशाशी लढायचे का? चीन आमच्या जमिनीवर कब्जा करत आहे, पण भारत सरकार त्यांना बक्षीस देत आहे. भारत सरकारने चीनसोबत व्यापार वाढवला आहे.

# आम्ही लोकशाही-संविधान वाचवले!

## » म्हणून तुम्ही पंतप्रधान झाला आहात : मल्लिकार्जुन खरगे

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे म्हणाले की, पंतप्रधान मोदी विचारतात की काँग्रेसने गेल्या 70 वर्षांत काय केले? आम्ही इतकी वर्षे लोकशाही आणि संविधान वाचवले, म्हणूनच आज तुम्ही पंतप्रधान झाला आहात. / यांच्या राजवटीत कोणी काही बोलले तर ते तुरुंगात टाकतात. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी गुरुवारी दिल्लीतील तालकटोरा स्टेडियमवर महिला काँग्रेस ब्लॉकच्या अध्यक्ष आणि पदाधिकाऱ्यांना संबोधित करताना ही माहिती दिली.**

2014 च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी पंतप्रधान मोदींनी दरवर्षी 2 कोटी तरुणांना नोकऱ्या देण्याचे आश्वासन दिले होते. यासोबतच त्यांनी परदेशात जमा केलेला काळा पैसा परत आणून देशातील नागरिकांना 15 लाख रुपये देण्याचे आश्वासन दिले होते, मात्र त्यांनी दिलेले आश्वासन पूर्ण केले नाही.

देशाचा पंतप्रधान असा लबाड असतो का? देशाचा पंतप्रधान बेईमान कसा असू शकतो? इंदिराजी आणि राजीवजींनी देशाला एकसंध ठेवण्यासाठी बलिदान दिले. काँग्रेस पक्षातील बड्या नेत्यांनी देशासाठी प्राण दिले. भाजपकडे असा कोणता नेता आहे? आम्ही या देशासाठी योगदान देत आहोत, आम्ही इथे




स्वतःसाठी आलो नाही. राजकारण ही सेवा आहे. गांधीजींना काय मिळाले? ते या देशाचे ना पंतप्रधान झाले ना राष्ट्रपती. पण आपले संपूर्ण आयुष्य देशासाठी समर्पित करून भारताला स्वातंत्र्य मिळवून दिले. मणिपूरचा उल्लेख करून खर्गे म्हणाले की, मणिपूर अजूनही दारुगोळ्याच्या ढिगावर बसले आहे, पण हे सरकार त्याकडे लक्ष देत नाही. आम्ही पंतप्रधान मोदींना मणिपूरवर सभागृहात चर्चा करण्याची मागणी केली, पण पंतप्रधान येत नव्हते. आम्ही अविश्वास ठराव मांडला तेव्हा ते आले. असे लोक देशाचे रक्षण कसे करणार? देशासाठी काय त्याग करणार? राहुल गांधी मणिपूरला जाऊ शकतात तर पंतप्रधान मोदी

### पंतप्रधान आपल्या घरी तिरंगा फडकवणार

15 ऑगस्ट रोजी मोदीजी म्हणाले की ते 2024 मध्ये लाल किल्ल्यावर तिरंगा फडकवतील. मला वाटतं ते तिरंगा नक्कीच फडकावतील पण लाल किल्ल्यावर नाही तर त्यांच्या घरी. 2024 मध्ये भाजपचे सरकार हटवायचे आहे, कारण त्यांच्या सरकारमध्ये कोणीही खूश नाही, अशी प्रतिज्ञा तुम्हाला घ्यावी लागेल. म्हणूनच मी तुम्हा सर्वांना सल्ला देऊ इच्छितो की चांगले काम करा आणि भाजपला हटवा


का नाही? मणिपूरमध्ये लोक मारले जात आहेत, पण पंतप्रधान मोदी प्रचारात व्यस्त आहेत. भाजप एकत्र येण्याचे काम करत नाही तर फूट पाडण्याचे काम करते. दंगलीत माझे घर जाळल्यामुळे मी माझ्या आईला, बहिणीला पाहू शकलो नाही, असे खरगे म्हणाले. लोकांनी मला आशीर्वाद दिला आणि काँग्रेसने मला आशीर्वाद दिला, त्यामुळेच मी आज येथे आहे. मी इंदिराजींच्या विचारसरणीवर पाऊल ठेवले आणि तुमच्या सर्वांच्या आशीर्वादाने मी पुढे जात आहे. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, भारतातील महिला केवळ शोषणाला घाबरतात. भाजप आणि आरएसएसच्या लोकांची विचारधारा अशी आहे की त्यांना शिक्षण देऊ नका आणि त्यांना फक्त काम करायला लावा.

# घुमर घुमू दे रे बाप्पा!



बॉलिवूडचे महानायक अमिताभ बच्चन हे नेहमीच कोणत्या ना कोणत्या कारणाने चर्चेत असतात. 'कौन बनेगा करोडपती'च्या 15 व्या सीझन सुरू झाला आहे. सध्या बिग बी त्या शोमध्ये व्यस्त आहेत. त्यामुळे सोशल मीडियावर ते चर्चेत आहेत. त्यातच आता सोशल मीडियावर पुन्हा एकदा बिग बींची चर्चा सुरु झाली आहे. त्याचा एक व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. या व्हिडिओमध्ये अमिताभ बच्चन सिद्धिविनायकाच्या मंदिरात विना चप्पल पोहचले आहेत. त्यांचा मुलगा अभिषेक बच्चनचा 'घूमर' हा चित्रपट 18 ऑगस्टला चित्रपटगृहात प्रदर्शित होत आहे. या चित्रपटात अमिताभ बच्चनदेखील छोट्या भुमिकेत दिसणार आहे. गुरुवारी मुंबईतील प्रसिद्ध सिद्धिविनायक मंदिरात ते पोहोचले. यावेळी त्याच्यासोबत आणखी काही लोक देखील होते त्यासोबतच त्यांच्या सुरक्षेसाठी पोलीसही त्यांच्या सोबत होते.

# जॉन अभिनेता नसता तर मेकॅनिक असता



अभिषेक बच्चन आणि जॉन अब्राहमची मैत्री कोणापासूनही लपलेली नाही. अभिषेकने जॉनबद्दल बोलताना, तो अभिनेता नसून मेकॅनिक व्हायला हवा होता, असे म्हटले आहे. त्याला बाइक्सची खूप आवड आहे. बाईक चालवण्याबरोबरच तो त्यांना असेंबलही करतो. त्याला बाईकशी छेडछाड करायला आवडते. नशिबाने त्याला अभिनेता बनवले, नाहीतर तो कुठेतरी मेकॅनिक झाला असता, असे त्याने म्हटले. अभिषेकने एका जुन्या मुलाखतीत सांगितले होते की, जॉन अब्राहमनेच त्याला बाइक चालवायला शिकवले होते. आधी अभिषेक बाईक चालवताना घाबरला होता. अभिषेक आणि जॉनने धूम चित्रपटात एकत्र काम केले होते. चित्रपटाचा केंद्रबिंदू सुपर बाईकच होत्या. अभिषेक बच्चन त्याच्या आगामी 'घूमर' चित्रपटामुळे चर्चेत आहे. चित्रपटाच्या प्रमोशनदरम्यान त्याला बाइकबाबतही काही प्रश्न विचारण्यात आले. तो म्हणाला- माझा एक मित्र आहे, जॉन अब्राहम. मला वाटते की त्याला बाईक खूप आवडतात. तो आधी बाईक डिस्मेंटल करतो आणि नंतर पुन्हा असेंबल करतो. त्याला हे काम खूप आवडते. मी त्याच्याकडून बाइक्सबद्दल खूप काही शिकलो आहे.

# केक घेऊन आली सारा



सैफ अली खान 53 वर्षांचा झाला आहे. या खास प्रसंगी सैफ अली खानची मुलगी सारा अली खान त्याला वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी पोहोचली. सारासोबत तिचा भाऊ इब्राहिमही दिसला. दोघेही सैफ आणि करिनाच्या घराबाहेर स्पॉट झाले होते. त्याचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर समोर आला आहे. व्हिडिओमध्ये सारा पारंपरिक लूकमध्ये दिसत आहे. पांढऱ्या सूटमध्ये ती खूप सुंदर दिसत आहे. तर इब्राहिम कॅज्युअल स्टाईलमध्ये दिसला. सारा तिच्या वडिलांसाठी केक आणि फुगे घेऊन पोहोचली. त्यावर बेस्ट डॅड असे लिहिले होते. करीना कपूरने एक रोमँटिक फोटो शेअर करत सैफला वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. बेबोने सैफसोबतचा एक फोटो शेअर केला, त्यामध्ये दोघे पूलजवळ बसलेले दिसत आहेत. फोटो शेअर करताना बेबोने कॅप्शनमध्ये लिहिले की, 'मी इंस्टाग्रामवर पोस्ट केलेला हा फोटो त्याने निवडला आहे. तो माझ्या समोर बसून हसत आहे, आणि का हसू नये आज त्याचा वाढदिवस आहे. वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा. साराच्या आगामी प्रोजेक्ट्सबद्दल बोलायचे झाले तर ती लवकरच आदित्य रॉय कपूरसोबत 'मेट्रो इन दिनों' या चित्रपटात दिसणार आहे. अनुराग बासू दिग्दर्शित हा चित्रपट पुढील वर्षी मार्च 2024 मध्ये प्रदर्शित होणार आहे. आदित्य, सारा व्यतिरिक्त या चित्रपटात अनुपम खेर, नीना गुप्ता, पंकज त्रिपाठी, कोंकणा सेन शर्मा, अली फजल आणि फातिमा सना शेख हे कलाकार देखील दिसणार आहेत.

# ड्रिम गर्ल 2 मध्ये अनन्या का ?

बॉलिवूडमध्ये सध्या अक्षय कुमारच्या 'OMG2' आणि सनी देओलच्या 'गदर 2' ची चांगलीच हवा आहे. असं असलं तरी आणखी एक सिनेमा रिलिज होण्याच्या तयारीत आहे ज्याची प्रेक्षकही आतुरतेने वाट बघत आहे तो सिनेमा म्हणजे आयुष्मान खुराना 'ड्रीम गर्ल 2'. या चित्रपटाचा ट्रेलर आणि गाणी देखील रिलिज झाली आहेत. यांना प्रेक्षकांचा भरभरुन प्रतिसाद देखील मिळत आहे. त्यामुळे आता चित्रपटाचे कलाकार देखील 'ड्रीम गर्ल 2'च्या प्रमोशनमध्ये व्यस्त आहे. काही दिवसांनी हा सिनेमा थिएटरमध्ये दाखल होणार आहे. 2019 मध्ये आलेल्या 'ड्रीम गर्ल'चा हा सिक्वेल आहे. पहिल्या भागात नुसरत भरूचा आणि आयुष्मान खुराना हे दोन्ही कलाकार होते तर यावेळी सिक्वेलमध्ये नुसरत भरुचाच्या जागी अनन्या पांडेला कास्ट करण्यात आले आहे. त्यामुळे आता या चित्रपटात नुसरत दिसणार नाही. एकीकडे तिच्या चाहत्यांना देखील हे मुळिच आवडलेल नाही. तर दुसरीकडे नुसरतने देखील आता यावर प्रतिक्रिया दिली आहे. तिच्या जागी अनन्या पांडेला घेतलं असल्याचं कळाल्यानंतर तिला कसं वाटलं तिची काय प्रतिक्रिया होती याबद्दल तिने एका मुलखातीत सांगितलं आहे. नुसरत भरुचाने यावर भाष्य केलं. ती म्हणाली की, चित्रपटाच्या पहिल्या भागात टीमसोबत काम करताना तिला खूप मजा आली होती. मात्र या सिनेमाच्या दुसऱ्या भागात तिला का घेतलं नाही याबद्दल तिला काही माहित नाही. याचे उत्तर आता ड्रीम गर्ल 2 चे निर्मातेच सांगू शकतात असं ही ती म्हणाली. पुढे कास्टिंगबद्दल बोलतांना ती म्हणते की, ती देखील एक माणूस आहे, त्यामुळे तिला जेव्हा हे कळालं तेव्हा तिला नक्कीच वाईट वाटलं. अर्थातच ते अन्यायकारक होतं. चित्रपटात कोणाला कास्ट करायचा हा निर्मात्यांचा निर्णय आहे हे तिला आता समजलं आहे. सध्या नुसरत भरुचा तिच्या 'अकेली' या चित्रपटाच्या प्रमोशनमध्ये व्यस्त आहे. तिचा हा सिनेमा देखील 25 ऑगस्टला थिएटरमध्ये रिलिज होणार आहे जो आयुष्मान खुरानाच्या 'ड्रिम गर्ल2' ला टक्कर देईल.



# सनीने कतरिनाला मारला टोमणा

सनी देओल आणि अनिल शर्मा सध्या 'गदर-2'च्या सक्सेसचा आनंद घेत आहेत. चित्रपटाने अवघ्या 5 दिवसांत जगभरात 290 कोटी रुपये कमवून बॉक्स ऑफिसचे अनेक रेकॉर्ड मोडले आहेत. प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना सनीने 'अपने' चित्रपटाच्या सिक्वेलबद्दल सांगितले. सनी म्हणाला की, तो या चित्रपटाच्या स्क्रिप्टवर काम करत आहे. सनीने या कार्यक्रमात कतरिन कैफचे नाव न घेता टोमणा मारला. कार्यक्रमाच्या सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या एका व्हिडिओमध्ये सनी म्हणतो, 'अपनेसाठीची कथा माझ्याकडे आहे, पाहुयात पुढे कधी सुरू होईल ते... ही एक अतिशय सुंदर कथा आहे. पहिल्या भागाप्रमाणेच कौटुंबिक मुल्ये दाखवणारी आणि तिच कथा पुढे नेणारी आहे. सनी पुढे म्हणाला, 'फक्त अशा काही अभिनेत्री होत्या ज्यांना आईची भूमिका करायला भीती वाटत होती, कदाचित आता त्या करतील.' सनी देओलच्या या वक्तव्याचे अनेक अर्थ निघत आहेत. सनीने कतरिनाची खरडपट्टी काढल्याचे मानले जात आहे.



दुसरीकडे, काही लोकांच्या मते सनीने हा टोमणा अमिशा पटेलला लगावला. कतरिना कैफने 2007 मध्ये प्रदर्शित झालेल्या 'अपने' चित्रपटात बॉबी देओलच्या प्रेयसीची भूमिका साकारली होती. तेव्हा कतरिना इंडस्ट्रीत नवीन होती. कदाचित ती आईची भूमिका साकारायला घाबरत असेल, अशी चर्चा केली जात आहे. 'अपने'मध्ये सनी देओल, धर्मेंद्र आणि बॉबी देओल मुख्य भूमिकेत दिसले होते. या चित्रपटात शिल्पा शेट्टीने सनीच्या पत्नीची भूमिका साकारली होती. तर कतरिना बॉबीच्या अपोझिट होती. हा चित्रपट 'गदर' फेम दिग्दर्शक अनिल शर्मा यांनी दिग्दर्शित केला होता.

# मोहित कुमारला सुवर्ण!

## » रशियाच्या एल्डर अखमाडुनिनोवचा पराभव

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**भारताचा मोहित कुमार (६१ किलो) २० वर्षांखालील गटातील फ्री-स्टाईल प्रकारातील नवा जगज्जेता मल्ल ठरला. या वयोगटात विजेतेपद मिळविणारा मोहित चौथा भारतीय ठरला. दरम्यान, मुलींच्या ७६ किलो वजनी गटातून प्रियाने अंतिम फेरी गाठली. यापूर्वी मुलींच्या गटात गेल्या वर्षी अंतिम पंघालने ५३ किलो गटात विजेतेपद मिळवले होते.**

हितने बुधवारी झालेल्या अंतिम लढतीत रशियाच्या एल्डर अखमाडुनिनोवचा गुणांवर ९-८ असा पराभव केला. लढतीत एकवेळ मोहित ०-६ असा पिछाडीवर होता. मात्र, वेगवान कुस्ती करण्याच्या नादात एका क्षणी एल्डर उर्जा गमावून बसला आणि त्याचा फायदा घेत मोहितने सलग नऊ गुणांची कमाई करून विजेतेपदावर शिक्कामोर्तब केले. २० वर्षांखालील गटात भारताला जागतिक स्पर्धेत २०१९ नंतर विजेतेपद मिळाले. त्यावेळी दीपक पुनिया विजेता ठरला होता. दीपक आता वरिष्ठ गटात खेळतो. मोहित भारताचा या गटातील चौथा विजेता ठरला.

यापूर्वी पलिवदर चिमा (२००१) आणि रमेश कुमार (२००१) यांनी विजेतेपद पटकावले होते. फ्री-स्टाईल विभागात ७४ किलो वजनी गटात जयदीप आणि १२५ किलो वजनी गटात रजत राहुल कांस्यपदकाचे मानकरी ठरले. जयदीपने किर्गिस्तानच्या




झॉकशिलीक बेटाशोवाच ४-२, तर राहुलने कॅनडाच्या करनवीर सिंग माहिलचा ९-८ असा पराभव केला. यापूर्वी मंगळवारी झालेल्या लढतीतून सागर जगलने (७९ किलो) रौप्य, तर दीपक चहलने (९७ किलो) कांस्यपदक पटकावले. दरम्यान, मुलींच्या गटातून प्रियाने आक्रमक सुरुवात करण्याचा प्रयत्न करणाऱ्या अमेरिकेच्या केनेडी ब्लेडसचा प्रतिकार सहजपणे एकतर्फी लढतीत १०-० असा मोडून काढ़ला. प्रियाने आपल्या सर्व लढती एकतर्फी जिंकल्या. पहिल्या फेरीत तिने अल्बेनियाच्या मारिया सिलीनवर ४-० अशी मात केली, उपांत्यपूर्व फेरीत अल्बेनियाच्याच ऑलिआक्झांड्रा काइलोवाचा प्रतिकार ११-० असा मोडून काढला. मुलींच्या गटातील अन्य एका लढतीत ६८ किलो वजनी गटात आरजूला उपांत्य फेरीत अल्बेनियाच्या एलिझाबेटा पेटलीकोवाकडून ३-९ असा पराभव पत्करावा लागला. आरजू आता कांस्यपदकाची लढत खेळेल.

### प्रियाने सर्व लढती एकतर्फी जिंकल्या

» मुलींच्या गटातून प्रियाने आक्रमक सुरुवात करण्याचा प्रयत्न करणाऱ्या अमेरिकेच्या केनेडी ब्लेडसचा प्रतिकार सहजपणे एकतर्फी लढतीत १०-० असा मोडून काढ़ला. प्रियाने आपल्या सर्व लढती एकतर्फी जिंकल्या. पहिल्या फेरीत तिने अल्बेनियाच्या मारिया सिलीनवर ४-० अशी मात केली, उपांत्यपूर्व फेरीत अल्बेनियाच्याच ऑलिआक्झांड्रा काइलोवाचा प्रतिकार ११-० असा मोडून काढला.

# कपिल देव यांचा रोहितला सल्ला

## » कर्णधार म्हणून आक्रमक व्हायला हवे

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**भारताचा माजी कर्णधार कपिल देव यांनी रोहित शर्माला एकदिवसीय विश्वचषक 2023 सुरू होण्यापूर्वी सल्ला दिला आहे. रोहितने कर्णधार म्हणून अधिक आक्रमक व्हायला हवे, असे कपिल देवने म्हटले आहे. कोची येथे एका कार्यक्रमादरम्यान टाईम्स ऑफ इंडियाशी बोलताना, 1983 विश्वचषक विजेत्या संघाचे कर्णधार कपिल देव म्हणाले, 'बॅजबॉल ही एक जबरदस्त गोष्ट आहे. इंग्लंड आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात नुकतीच संपलेली ऍशेस मालिका ही अलिकडच्या काळात मी पाहिलेली सर्वोत्तम मालिका होती.**

माझ्या मते क्रिकेट असेच खेळले गेले पाहिजे. रोहित शर्मा चांगला कर्णधार आहे, पण त्याने



### विश्वचषक 5 ऑक्टोबरपासून

» भारतात ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये 46 दिवस एकदिवसीय विश्वचषक रंगणार आहे. त्यात 48 सामने खेळवले जातील. पहिला सामना 5 ऑक्टोबर रोजी अहमदाबादमध्ये मागील विश्वचषकातील विजेता आणि उपविजेता इंग्लंड आणि न्यूझीलंड यांच्यात होणार आहे. 12 नोव्हेंबरपर्यंत ग्रुप स्टेजचे 45 सामने होतील. 15 आणि 16 नोव्हेंबरला दोन सेमिफायनल आणि 19 नोव्हेंबरला फायनल अहमदाबादमध्ये होणार आहे.

अधिक आक्रमक व्हायला हवे. सध्या इंग्लंडसारखे संघ कसे खेळत आहेत हे पाहावे लागेल. केवळ रोहित शर्माच नाही तर सर्व संघांना याचा विचार करावा लागेल. सामना जिंकणे हे पहिले प्राधान्य असले पाहिजे ड्रॉ करणे नाही. 'संघाने प्रथम विश्वचषकात टॉप-4मध्ये पोहोचण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्यानंतरच त्यांनी पुढील नियोजन करावे. उपांत्य फेरीसारख्या सामन्यांमध्येही तुम्हाला नशिबाची गरज आहे, परंतु सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे प्रथम टॉप-4 मध्ये पोहोचणे.

भारताचा विश्वचषकातील पहिला सामना 8 ऑक्टोबर रोजी ऑस्ट्रेलियाविरुद्ध होणार आहे. 'मला वाटत नाही की खेळाडूंची तुलना करणे योग्य आहे. गेल्या 20-30 वर्षात आम्ही अनेक वेगवान गोलंदाज तयार केले आहेत ज्यांवर अवलंबून राहू शकतो आणि ते अधिक महत्त्वाचे आहे. तुम्हाला फक्त वेगवान गोलंदाजी करणाऱ्या अष्टपैलूंची गरज नाही, तर तुम्हाला फिरकी गोलंदाजी करणाऱ्या अष्टपैलू खेळाडूंचीही गरज आहे आणि तुमच्याकडे भारतीय संघात काही चांगले खेळाडू आहेत. रवींद्र जडेजा हुशार आहे, अश्विन अप्रतिम कामगिरी करत आहे.

# एमएस धोनीच्या निवृत्तीला तीन वर्षे पूर्ण

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

टीम इंडियाचा माजी कर्णधार एमएस धोनीच्या निवृत्तीला आज तीन वर्षे पूर्ण झाली आहेत. धोनीने 15 ऑगस्ट 2020 रोजी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली. त्याने इंस्टाग्रामवर एक व्हिडिओ शेअर केला आणि पोस्टला कॅप्शन दिले: "तुमच्या सर्व प्रेम आणि समर्थनासाठी खूप खूप धन्यवाद. मला 19.29 वाजता निवृत्त समजा व्हिडिओच्या बॅकग्राऊंडला अमिताभ बच्चन यांच्या 'कभी कभी' चित्रपटातील 'मैं पल दो पल का शायर हूं' हे प्रसिद्ध गाणे वाजत होते. धोनी भारतीय संघाचा कर्णधार होता, त्याने 2007 मध्ये ICC पुरुष T20 विश्वचषक, 2011 मध्ये ICC पुरुष क्रिकेट विश्वचषक आणि 2013 मध्ये ICC चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकली होती.

धोनी अखेरचा आंतरराष्ट्रीय एकदिवसीय क्रिकेट सामना 2019 विश्वचषकाच्या उपांत्य फेरीत खेळला होता. मँचेस्टरमध्ये 9 जुलै 2019 रोजी न्यूझीलंडविरुद्ध खेळल्या गेलेल्या या सेमिफायनलमध्ये धोनीने 72 चेंडूत 50 धावा केल्या.

मार्टिन गप्टिलच्या थ्रोवर तो 2 इंचांनी क्रीजबाहेर राहिला आणि बाद झाला. त्यामुळे भारताचा विश्वचषकही या 2 इंचाने मुकला असे मानले जात आहे. गांगुलीने त्याच्या जागी धोनीला क्रमांक-3 वर फलंदाजीसाठी पाठवले. धोनी पदार्पणाच्या सामन्यातही धावबाद झाला होता. धोनी या मालिकेत फ्लॉप ठरला. तीन एकदिवसीय सामन्यांमध्ये त्याने केवळ 19 धावा केल्या, परंतु पाकिस्तानविरुद्धच्या पुढील मालिकेत 123 चेंडूत 148 धावांची संस्मरणीय खेळी खेळून तो संघाचा सर्वात विश्वासार्ह खेळाडू बनला.